ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55027

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष १२ | पुणे, बुधवार, २१ जानेवारी, १९७० | अंक २




### अहमदाबादमध्ये काळ्या पैशासाठी कित्येक धाडी

हिंदच्या अर्थव्यवस्थेत विनहिशोबी काळ्या पैशाने उडवून दिलेला गोंधळ सर्वमान्यच आहे. असा पैसा हुडकून काढण्याचे प्रयत्न सरकारचे प्राप्तिकर खाते करीत असते. अलीकडेच अहमदाबाद शहरात प्राप्तिकर खात्याच्या अधिकाऱ्यांनी अनेक व्यापारी कचेऱ्यांवर आणि खाजगी घरांवर धाडी घालून बराच काळा पैसा शोधून काढला आहे. दोन दिवसांत सुमारे ६० निरनिराळ्या ठिकाणी धाडी घालण्यात आल्या. आतापर्यंत १ लाख, ६५ हजार रुपयांची काळी रक्कम उजेडात आणण्यात आली आहे. पण, ह्या धाडींचे मार्गदर्शन करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अंदाजाप्रमाणे सुमारे ४० ते ५० लाख रु. इतक्या मोठ्या रकमेचे बेकायदा व्यवहार झालेले असावेत. धाडींत हाताशी लागलेल्या बेकायदा व्यवहाराच्या कागदपत्रांवरून हा अंदाज करण्यात आला आहे. ह्या धाडींच्या अनुषंगाने बेकायदा सोन्याचे साठेही उघडकीस आले आहेत. सुमारे १५ हजार रुपयांचे गिनी गोल्ड अबकारी खात्याच्या अधिकाऱ्यांनी हस्तगत केले आहे. प्राप्तिकर खात्याचे अधिकारी शेजारच्या घराची झडती घेत आहेत हे पाहून एका माणसाने आपल्याजवळील १५ हजार रुपयांच्या नोटा घरातील रद्दीच्या टोपलीखाली दडवून ठेवल्या व तो पसार झाला. पण, त्याचा काही उपयोग झाला नाही. अधिकाऱ्यांनी तो पैसा तर ताब्यात घेतलाच; पण आणखीही काही विनहिशेबी पैसा झडतीत मिळविला. दुसऱ्या एका माणसाने आपल्या बेकायदा सावकारी व्यवहाराच्या हिशेबाच्या पुस्तकांना काडी लावली परंतु त्याच्या धुरामुळे शेजारच्या घरातील अधिकाऱ्यांना संशय आला व त्यांनी त्या माणसाच्या काही संशयास्पद कागदपत्रांवर झडप घातली.

---

### इंडिअन एअरलाइन्सला १.६६ कोटींचा नफा

देशातील अंतर्गत विमानवाहतूक करणाऱ्या इंडिअन एअर लाइन्स ह्या राष्ट्रीयीकरण झालेल्या कंपनीला १९६८–६९ सालात १.६६ कोटी रुपयांचा निव्वळ नफा झाला आहे. संबंधित वर्षाचा अहवाल लोकसभेत मांडण्यात आला. अहवालातील इतर माहिती अशी : कंपनीचे राष्ट्रीयीकरण झाल्यापासून उरलेल्या निव्वळ नफ्याचा हा उच्चांक आहे. १९६६–६७ साली कंपनीला २८.३५ कोटी रुपयांचा व १९६७–६८ साली २.६२ कोटी रुपयांचा तोटा झाला होता. कंपनीच्या कामगिरीत झालेली ही सुधारणा दोन गोष्टींनी साधली आहे. एक तर प्रवाशांच्या वाहतुकीत जोराची वाढ झालेली आहे. त्याचप्रमाणे कंपनीच्या विमानांच्या वजन नेण्याच्या शक्तीतही एकंदरीत वाढ झालेली आहे. प्रवाशांच्या वाहतुकीत झालेल्या वाढीचे प्रमाण पुढील आकड्यांवरून दिसून येते. १९६८–६९ साली कंपनीने १०.९६ लाख प्रवाशांना वाहून नेले. १९६७–६८ साली १०.६६ लाख प्रवासी नेण्यात आले होते. १९६७–६८ साली कंपनीने परदेशी चलनात ६.८९ कोटी रुपयांची मिळकत केली होती. १९६८–६९ साली परदेशी चलनातील मिळकत ७.६१ कोटी रुपयांची झाली. कंपनीने अफगाणिस्तान, सिलोन आणि ब्रह्मदेश ह्या देशांशी विमानवाहतूक केली. त्यामुळे ३.६२ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत झाली. कंपनीजवळ सध्या असलेल्या विमानवाहतुकीच्या सोयी वाढविण्यासाठी आणि त्यांचे आधुनिकीकरण करण्यासाठीं सरकारकडे योजना सादर करण्यात आली आहे. त्यासंबंधी त्वरित निर्णय होणे जरूर आहे.

---

### शस्त्रास्त्रांच्या विक्रीवरील बंदी उठण्याचा संभव

भारत आणि पाकिस्तान ह्या देशांत १९६५ साली झालेल्या रणसंग्रामानंतर अमेरिकेने दोन्ही देशांना शस्त्रे पुरविणे बंद केले. ह्या शस्त्रबंदीचा फेरविचार होण्याची शक्यता उत्पन्न झाली आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याने ह्या विषयासंबंधी केलेल्या पाहणीवरून दोन्ही देशांना त्यांची इच्छा असल्यास शस्त्रास्त्रे पुरविण्याचा अमेरिकेचा विचार दिसत आहे. अमेरिकेने केलेली पाहणी गुप्त स्वरूपाची मानण्यात येत असली तरी तिचा आशय बाहेर फुटला आहे. १९६५ च्या युद्धानंतर अमेरिकेने शस्त्रपुरवठा थांबविल्यामुळे पाकिस्तानला रशिआ व चीनकडून शस्त्रास्त्रे मिळविण्याचे प्रयत्न करावे लागले ह्याची पाहणीत नोंद करण्यात आली आहे. भारत स्वतःला लागणारी बहुतेक शस्त्रास्त्रे स्वतःच बनवू लागल्यामुळे आणि रशिआकडूनही शस्त्रे मिळवीत असल्याने अमेरिकेने घातलेली बंदी उठविण्याबाबत त्याचा आग्रह नाही. उलट ही बंदी चालू राहणेच भारताला पसंत आहे. शिवाय हिंदमधील लोकमतही अमेरिकेने घातलेली बंदी उठविण्याच्या विरुद्ध आहे. पाकिस्तानला मात्र ही बंदी उठविली जावी असे वाटत आहे. ह्या बाबतीत अमेरिकेने अद्याप निर्णय घेतलेला नाही. कोणताही निर्णय घेण्यापूर्वी भारत आणि पाकिस्तान ह्या देशांतील अमेरिकन वकिलांचा सल्ला अर्थातच घेतला जाईल. शिवाय, पाकिस्तानचे सध्याचे लष्करी अध्यक्ष जनरल याह्यासान ह्यांचा अमल कितपत स्थिरावला आहे ह्याचाही विचार अमेरिकेला करावा लागणार आहे. दरम्यान, शस्त्रास्त्रबंदीच्या प्रश्नाविषयी अजून विचार चालू आहे असे उत्तर अमेरिकेकडून मिळत आहे.

---

### सेंट्रल बँक ५०० नव्या शाखा उघडणार

सेंट्रल बँक ऑफ इंडियाने १९६९ मध्ये १६९ नव्या शाखा उघडल्या. १९७० मध्ये ३०० नव्या शाखा उघडण्याचा तिचा कार्यक्रम आहे. गेल्या वर्षी बँकेच्या ठेवीत ६८ कोटी रु. ची भर पडून एकूण ठेवी ५०० कोटी रु. वर गेल्या. "बँकेच्या राष्ट्रीयीकरणामुळे ठेवींवर प्रतिकूल परिणाम होण्याची भीती खोटी ठरली आहे. ग्रामीण भागांतील शाखांकडे ठेवी मोठ्या प्रमाणावर येऊ लागण्यास थोडा काळ लागणे स्वाभाविक आहे" असे बँकेचे कस्टोडियन म्हणाले.

---

# ☆ अर्थ ☆

बुधवार, २१ जानेवारी, १९७०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


## ग्रामीण भागातील वीजपुरवठा

### दिव्यापेक्षा पंपिंग सेट्सना आता महत्त्व

ग्रामीण भागात वीजपुरवठा वाढविण्याचे महत्त्व आता मान्य केले गेले असून त्या दिशेने कसून प्रयत्न चालू आहेत. स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्डांची स्थापना राज्यांतून करण्यात आली आहे; ग्रामीण विद्युतपुरवठा वाढविण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

पहिल्या पंचवार्षिक योजनेचे वेळी ३,५०० पेक्षाही कमी खेडेगावांना वीजपुरवठा होत होता. ही गावे मुख्यत: म्हैसूर, तामिळ नाडु आणि उत्तर प्रदेश ह्यांतील होती. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात ह्याच राज्यांतून वीजपुरवठा वाढविण्यात आला आणि त्यावरील खर्चही थोडा म्हणजे २७ कोटी रु. होता. त्यामुळे त्या काळात फक्त ५,८५९ खेड्यांना वीज मिळू लागली.

दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळात ग्रामीण वीजपुरवठा वाढविण्यासाठी ७५ कोटी रु. खर्चण्यात आले. तिसऱ्या योजनेत तर त्यात खूपच वाढ झाली; १२५ कोटी रु. खर्च होऊन ४३,८२७ खेड्यांपर्यंत वीज पोचली.

१९६८ अखेर वीज पोहोचलेल्या खेड्यांची संख्या ६६,५९९ झाली आहे.

पंचवार्षिक योजनांना प्रारंभ झाला, तेव्हा भारतातील एकूण खेड्यांपैकी ०.६% खेड्यांना वीज होती. त्यानंतरच्या १८ वर्षांत हे प्रमाण १२% पर्यंत पोचले आहे. ५,००० वस्ती असलेल्या बहुतेक सर्व खेड्यांत आत वीज गेली आहे. गांधी शतसांवत्सरिक वर्षात, म्हणजे ऑक्टोबर, १९७० अखेर, १,००,००० खेड्यांना वीज पोहोचविली जाईल.

शेतीच्या उत्पादनवाढीचे महत्त्व लक्षात घेऊन विजेचे पंप बसविण्यावर भर देण्यात येत आहे. खेड्यांत विजेचा उजेड येण्यापेक्षा शेतीसाठी पाणी खेचणारे पंप जास्तीत जास्त सुरू करण्याचा कार्यक्रम महत्त्वाचा झाला आहे. मार्च, १९५१ मध्ये विजेवर चालणाऱ्या पंपांची संख्या फक्त १९,००० होती ती आता १० लक्ष झाली आहे. ४ थ्या पंचवार्षिक योजनेअखेर ती २३ लाखांवर जावी, अशी कल्पना आहे.

सर्व राज्यांतील विद्युतीकरणाची प्रगती सारखी नाही. तामीळ नाडूमधील ७५% गावांना वीज मिळत आहे, त्याखालोखाल केरळ (३९%), पंजाब (२५·१%), हरियाणा (२५·१%) ही राज्ये येतात. महाराष्ट्रातील १७·९% गावांना वीज मिळत आहे. आसाममध्ये ते प्रमाण फक्त ०·३%, ओरिसात १·४%, मध्यप्रदेशात १·९% आणि बंगालमध्ये ३·८% आहे.

विजेने चालणाऱ्या पंपांच्या बाबतीतही तामीळ नाडूचा पहिला अनुक्रम आहे. महाराष्ट्र, पंजाब आणि आंध्र प्रदेश ह्यांनीही चांगली प्रगती केली आहे. सबंध भारतातील विजेवर चालणाऱ्या पंपांपैकी ७०% ह्या चार राज्यांत आहेत.

तामीळ नाडूमधील चिंगलपुट, उत्तर अर्काट आणि दक्षिण अर्काट ह्या जिल्ह्यांतील विजेच्या पंपांनी त्यांचा कायापालट केला आहे. तेथे धान्योत्पादन स्थानिक गरजेपेक्षा जास्त होऊ लागले आहे, राहणीचे मान सुधारत आहे. त्याचे अनुकरण इतरत्र होणे अगत्याचे आहे.

### ग्रामीण वीजपुरवठ्याची प्रगती

| | खर्च (कोटी रु.) | किती खेड्यात वीज आली | | पंप सुरू झाले | |
|---|---|---|---|---|---|
| | | मुदतीत | एकूण | मुदतीत | एकूण |
| पहिली पंचवार्षिक योजना | २७ | ५,८५९ | ९,३१७ | ३३,२६० | ५१,९६९ |
| दुसरी पंचवार्षिक योजना | ७५ | १५,६८९ | २५,००६ | १,४०,९०७ | १,९२,८७६ |
| तिसरी पंचवार्षिक योजना | १२५ | १८,८२१ | ४३,८२७ | ३,२०,५७८ | ५,१३,४५४ |
| तीन वार्षिक योजना : १९६६-६७ ते ६८-६९ | १६६ | २२,७७२ | ६६,५९९ | ४,८५,०७४ | ९,९८,५२८ |
| चौथ्या पंचवार्षिक योजनेसाठी शिफारस | ३६३ | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही | १२,४१,८६० | २३,१०,५३७ |

### वेगवेगळ्या देशांतील व्यापारी बँकांच्या कचेऱ्या, ठेवी आणि कर्जपुरवठा

| देश | वर्ष | कचेऱ्यांची संख्या | लोकसंख्या (दशलक्ष) | दर कचेरीस लोकसंख्या (१०००) | ठेवी (दशलक्ष डॉलर) | कर्ज (दशलक्ष डॉलर) | दर माणशी ठेव (डॉलर) | दर माणशी कर्ज पुरवठा (डॉलर) | राष्ट्रीय उत्पन्नाशी ठेवींचे प्रमाण | राष्ट्रीय उत्पन्नाशी कर्ज पुरवठ्याचे प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| बर्मा | १९६४ | ७१ | २४ | ३३८ | १५७ | ५५ | ७ | २ | ११·५ | ४·० |
| सिलोन | १९६६ | १०५ | ११ | १०५ | ३१५ | १९४ | २९ | १८ | २०·८ | १२·८ |
| कॅनडा | १९६३ | ५,४४७ | १९ | ४ | १४,८९२ | ७,७०७ | ७८४ | ४०६ | ४९·० | २५·३ |
| भारत | १९६७ | ६,९८३ | ५११ | ७३ | ५,२८३ | ३,६६३ | १० | ७ | १४·२ | ९·८ |
| इराण | १९६७ | २,२७५ | २६ | ११ | ९७५ | १,५८५ | ३८ | ६१ | १५·१ | २४·५ |
| जपान | १९६५ | ६,६१९ | ९८ | १५ | ५७,३५३ | ५३,३८४ | ५८५ | ५४५ | ८४·३ | ७८·५ |
| पाकिस्तान | १९६३ | ९५७ | ९९ | १०३ | ९९० | ७७१ | १० | ८ | १३·१ | १०·२ |
| यु. अरब रिपब्लिक | १९६७ | १८० | ३१ | १७२ | १,३८५ | २,२७७ | ४५ | ७३ | १९·३ | ३१·८ |
| ग्रेट ब्रिटन | १९६५ | १४,००० | ५४ | ४ | २४,६१२ | १८,०१५ | ४५६ | ३३४ | ३०·७ | २२·५ |
| अमेरिका | १९६५ | २८,९३८ | १९४ | ७ | ३१३,००२ | २०१,९५८ | १,६१३ | १,०३९ | ५५·५ | ३५·७ |

**सुवर्णाच्या गुप्त साठ्याचा शोध**—ब्रह्मदेशाच्या पुराणवस्तू खात्याने अलीकडे एक शिलालेख उकरून काढला आहे. ह्या शिलालेखात पर्शिअन व उर्दू लिपीत अवघ्या आठ ओळी आहेत. ओळीतील माहितीवरून आराकानच्या एका प्राचीन राज्याने पुरलेला २३ टन वजनाचा सुवर्णाचा गुप्त साठा हाती लागण्यासारखा आहे. अडचण येवढीच की लिपीचा अर्थबोध होणे कठीण जात आहे.

---

**युरोपसाठी रशियामधील गॅस**—रशिआच्या उरल पर्वतापलीकडे भूमिगत गॅसचे मोठे साठे सापडलेले आहेत. तेथून हजारो मैलात नळ घालून युरोपला गॅसचा पुरवठा करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. सध्या रशिआ पूर्व युरोपला व ऑस्ट्रियाला नळांच्या द्वारा गॅस पुरवीत आहे. आणखी काही वर्षात तो पश्चिम युरोपलाही पुरविता येईल.

---

**पाकिस्तानसाठी फ्रेंच पाणबुडी**—फ्रान्समध्ये पाकिस्तानसाठी बांधण्यात आलेली एक नवी पाणबुडी नुकतीच समुद्रात सोडण्यात आली. पाकिस्तानने अशा तीन पाणबुड्यांची मागणी केली होती. त्यांतील ही दुसरी आहे. ती अत्याधुनिक असून वजनात १,०४१ टन आहे. खोल समुद्रातून ती जाऊ शकते. फ्रेंच व इतर काही देशांच्या आरमारात ह्या जातीच्या पाणबुड्या आहेत.


॥ श्री ॥

## दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणे ३०

**तुमचे या विठिवेयाचिये बोलें। स्नासिवळे प्रसन्नतेचे मळे।**
**ते साउली देखोनि लोळें। आंतु जी मी॥ श्री ज्ञानेश्वरी.**

(१) साखरेचे उत्पादन जोरात सुरू असून, साखरेचे उत्पादन १ लाख पोत्यांहून जास्त झाले आहे. चालू हंगामाच्या ठरविलेल्या साखरेच्या उत्पादनाच्या उद्दिष्टाकडे यशस्वी वाटचाल चालू आहे.

(२) डिस्टिलरी व्यवस्थित चालू असून, स्पिरिटचे उत्पादनही जोरात चालू आहे.

(३) मद्यनिर्मितीच्या कारखान्याच्या उभारणीचे काम संपत आले असून, सायलेंट स्पिरिटची ट्रायल जानेवारी अखेर घेण्यात येईल.

कंपनीची प्रगती व भरभराट होण्यासाठी भागीदार व ठेवीदार यांनी केलेल्या आर्थिक साहाय्याबद्दल त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार व प्रजासत्ताक दिनानिमित्त त्यांना अभिवादन व हार्दिक शुभेच्छा.

**भारतीय प्रजासत्ताक चिरायू होवो!**

गो. श्री. वाळिंबे, बी. कॉम्., मॅनेजर

शं. ल. लिमये, बी. एससी., एलएल. बी., वकील, अध्यक्ष

## समृद्धीची डोकेदुखी

### हॉट वॉटर हीटरजवळ एअरकंडिशनरचे दफन

समाज श्रीमंत बनत गेला, म्हणजे त्यातला प्रत्येकजण कमी कमी काम करायला लागतो. त्यामुळे श्रीमंती उपभोगण्यात व्यत्यय येतो.

वॉशिंग्टनमधील एका गृहस्थाचा एअरकंडिशनर बिघडला, तेव्हा ज्या कंपनीने तो बसविला होता, त्या कंपनीला त्याने फोन केला. फोनला कुठल्याही माणसाने उत्तर दिलेच नाही; रेकॉर्ड केलेल्या एका आवाजाने उत्तर दिले, "ॲफ्ल्युअंट हीटिंग ॲंड एअरकंडिशनिंग कंपनीचे हे ऑफिस आहे. आमचे सर्व प्लंबर साउथॅम्प्टनला वीकएन्डची सुटी घालविण्यासाठी गेले आहेत. तुमचा एअरकंडिशनर नीट काम देत नसेल, तर हा निरोप संपल्यावर तुमची हकीकत सांगा; ती येथे रेकॉर्ड होईल. आम्ही शक्य तितक्या लवकर प्लंबर पाठविण्याचा प्रयत्न करू."

हे उत्तर मोठेसे उत्तेजनकारक नव्हते. पण ह्या गिऱ्हाइकाने आपले नाव, पत्ता, टेलिफोन नंबर दिला. तीन दिवस वाट पाहून त्याने कंपनीकडे पुनः फोन केला, "माझा एअरकंडिशनर बिघडला आहे. तो दुरुस्त करायला कुणाला तरी पाठवता का?"

ज्या सेक्रेटरीने तो फोन घेतला, ती हसतच सुटली. हसणे आवरून ती म्हणाली, "आमचे सर्व प्लंबर काम संपवून घरी गेले आहेत."

"पण आत्ता कुठे दोन वाजताहेत." गिऱ्हाइकाने म्हटले.

सेक्रेटरीने उत्तर दिले, "खरे आहे पण त्यांच्या कामाला सकाळी ९ वाजताच सुरुवात होते. त्यांची युनियन आहे."

गिऱ्हाइकाने काकुळतीने विनंती करून सांगितले, की उद्या तरी एखाद्या प्लंबरला पाठवा.

"ते अशक्य आहे. आमचे प्लंबर घरी जाऊन प्लंबर दुरुस्त करण्यास तयार नसतात. तुम्ही तुमचा एअरकंडिशनर आमच्या ऑफिसात घेऊन आलात, तर इथला रेसिडेंट प्लंबर त्याबाबत काय करता येईल ते पाहील." सेक्रेटरीने उत्तर दिले.

"पण माझा एअरकंडिशनर खूप मोठा आणि जड आहे" असे गिऱ्हाईक म्हणत असतानाच सेक्रेटरीने त्याला जास्ती बोलू न देता म्हटले, "ठीक आहे. गुरुवारी ९ वाजताची अपॉइंटमेंट मी तुम्हांला देते."

गुरुवारी ह्या गिऱ्हाइकाने एक स्टेशनवॅगन भाड्याने घेतली आणि दोन मित्रांच्या साह्याने तो एअरकंडिशनर त्यात ठेवला. त्यासकट तो कंपनीच्या वेटिंगरूममध्ये दाखल झाला. तेथे ३० लोक बसलेले होते; प्रत्येकाच्या मांडीवर एअरकंडिशनर होता.

गिऱ्हाइकाने कपाळावरचा घाम पुसला, एवढ्यातच युनिफॉर्म घातलेली एक बाई त्याच्याजवळ आली आणि तिने त्याला विचारले, "ही तुमची पहिलीच व्हिजिट आहे का?" त्याने "होय" म्हणताच तिने सांगितले, "त्याला २५० रुपये चार्ज पडेल. पुनः यावे लागले, तर पुढच्या प्रत्येक व्हिजिटची फी फक्त २०० रुपये आहे." तिने एक नंबर दिला आणि नंबर पुकारला जाईल असे सांगितले.

दुपारी १२-३० वाजता ह्या गिऱ्हाइकाचा नंबर पुकारला गेला. त्याला प्लंबरच्या ऑफिसमध्ये नेण्यात आले. त्या वेळी प्लंबरसाहेब आपल्या शेअर ब्रोकरशी फोनवर बोलत होते, "मी तुम्हाला आय. बी. एम. चे १०,००० शेअर्स घ्यायला सांगितले होते; आय. टी. टी. चे नव्हेत. पुनः फोन करा."

प्लंबरने गिऱ्हाइकाच्या एअरकंडिशनरकडे वाकून पाहिले आणि थोड्याच वेळात जाहीर केले, "साहेब, तुमचा एअरकंडिशनर फारच बिघडलेला आहे. ह्या प्रकारच्या एअरकंडिशनरचा स्पेशॅलिस्ट युरोपला शिडाच्या बोटीतून समुद्र-सफरीला गेला आहे. तुम्ही काही दिवसांपूर्वी आला असतात, तर......"

गिऱ्हाइकाने एअरकंडिशनर घरी नेऊन घरामागच्या अंगणात ठेवला; रात्री त्याचे मागच्या परसात दफन केले. गेल्या वर्षी हॉट वॉटर हीटर असाच बिघडून निकामी झाला होता आणि प्लंबर न आल्यामुळे पुरून टाकला होता, त्याच्याच शेजारी एअरकंडिशनरला जागा मिळाली.

---

### काळपुळीच्या रोगापासून बचाव

जागतिक आरोग्य संघटनेच्या तज्ज्ञांच्या मताने कॅन्सरच्या रोगाची बाधा झालेल्या रुग्णांपैकी निम्म्या लोकांचा तरी बचाव करता येण्यासारखा आहे. मात्र त्यासाठी रोगाचे निदान त्याच्या प्राथमिक अवस्थेत करण्यात येऊन तातडतोब परिणामकारी योग्य उपायांची व्यवस्था झाली पाहिजे. जागतिक आरोग्य संघटनेने ह्या रोगाच्या उद्भवाची माहिती लवकर मिळण्याच्या दृष्टीने एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. अहवालातील माहितीप्रमाणे काळपुळीने ग्रस्त स्त्रियांपैकी ६ टक्के स्त्रियांना स्तनाचा कॅन्सर होतो. अमेरिकेत फुफ्फुसांतील कॅन्सरने दरसाल ६० हजार लोक दगावतात. अमेरिकेत गेल्या १५ वर्षांत ह्या रोगाने मरण पावत असलेल्या लोकांची संख्या ११३ टक्क्यांनी वाढली आहे. त्याशिवाय गर्भाशय, तोंड आणि कातडी ह्यांच्या काळपुळीने अमेरिकेत दरसाल ४५ हजार लोक दगावतात.

---

### केसांच्या ओलेपणामुळे निर्यातीत तोटा

तिरुपती ह्या प्रसिद्ध यात्रेच्या ठिकाणी हजारो भाविक आपल्या केसांचे दान करतात. हे केस गोळा करून टोप करण्यासाठी परदेशी पाठविण्याचे काम व्यापार महामंडळ करीत असते. अंतर्गत हिशेबतपासनिसांनी मंडळाच्या कार्यपद्धतीवर टीका केली आहे. त्यांचे म्हणणे असे की, व्यापारमंडळ केसांना देत असलेली किंमत कोरड्या केसांची आहे. प्रत्यक्ष मात्र ओले केसच विकत घेण्यात येतात, त्यामुळे मंडळाचे नुकसान होत आहे. केसांतील ओलावा नष्ट करून मग ते मद्रास येथील टोपांसाठी केस तयार करणाऱ्या कारखान्यात पाठविण्याची एक योजना व्यापार महामंडळाने आता आखली आहे. त्यासाठी तिरुपती येथे विजेच्या साह्याने केस कोरडे करण्याचे केंद्र स्थापन करण्यात येणार आहे. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत मंडळाला ६.२ लाख रुपये तोटा झाला आहे.

## कामगारांवरील देखरेखीचे स्वरूप

### ह्या तीन गोष्टी टाळा

हाताखालच्या कामगारांवरील देखरेखीचा अतिरेक केला, म्हणजे कामगारांची जबाबदारीची जाणीव कमी होते; कामात आपण होऊन काही सुधारणा करण्याची त्यांची प्रेरणा नष्ट होते. ह्यासाठी तीन गोष्टी टाळायला हव्यात.

(१) कामगारांना सर्वसाधारण मार्गदर्शन करा; तपशीलवार सूचना देऊन त्यांच्या अमलबजावणीसाठी त्यांच्यावर पाळत ठेवू नका. कामगारांना अमक्या वेळात एवढे करा असे सांगा; त्याची आखणी त्यांच्यावरच सोपवा. सुपरवायझरने प्रत्येक कामगाराची अधूनमधून गाठ घ्यावी आणि कामाच्या पद्धतीविषयी त्याच्याशी चर्चा करावी.

(२) मॅनेजर स्वतःच्या उत्कर्षाच्या दृष्टीने विचार करण्यात गर्क असतात; प्रत्येक कामगारालाही त्याचा स्वतःचा उत्कर्ष साधावयाचा असतो, हे ते विसरतात. कामगारांच्या विकासाला वाव दिला म्हणजे स्वतःवर त्याचा प्रतिकूल परिणाम होईल, असे मॅनेजरांना वाटत असते. पण ते खरे नसते. कामगारांच्या विकासाला संधी मिळवून दिली पाहिजे.

(३) तुम्हाला कामगारांनाही जाब द्यावा लागतो, हे विसरू नका. तुमचा बॉस तुम्हाला न सांगता एक आठवडाभर परगावी गेला आहे आणि तुम्हाला काही अडचण निर्माण झाली आहे, असे समजा. ह्या परिस्थितीत सुपरवायझरची जी गत होते, तीच सुपरवायझर काही वेळ त्याच्या जाग्यावर नसला तर कामगारांची होते. कामगारांना सुपरवायझर केव्हाही उपलब्ध हवा; त्याला नेमके कुठे गाठायचे हे कामगारांना सांगून ठेवावयास हवे. कामगारांना जाब द्यावा लागण्याची आणखी दोन उदाहरणे सांगता येतील. (अ) हाताखालच्या माणसाला तपशीलवार रिपोर्ट तयार करावयास सांगावयाचा आणि तो मिळाल्याचेही त्याला कळवावयाचे नाही; त्याच्या उपयुक्ततेबद्दल तर बोलायचेच नाही. (ब) अवघड प्रश्नांवर कनिष्ठांची मते आणि सूचना घेण्यासाठी त्यांची सभा बोलवावयाची आणि त्याबद्दल पुनः उल्लेखही करावयाचा नाही.

तुम्ही फार कामात होता किंवा माहिती उपयुक्त नव्हती, अशा समजुतीखाली गप्प बसणे घातुक आहे. कामगार त्यामुळे कामापेक्षा इतर ठिकाणी आपले लक्ष घालू लागतील. कामगार स्वतःच्या कामात जेवढे मग्न होतील, तेवढे देखरेखीचे काम कमी होते आणि कार्यक्षमता वाढते.

---

### सहकारी चळवळींच्या पाहणीसाठी अमेरिकन तज्ज्ञ

महाराष्ट्र आणि गुजरात येथील सहकारी व पंचायती राज्य चळवळींची पाहणी करण्यासाठी श्री. विल्यम बी. पामर हे अमेरिकन तज्ज्ञ येणार आहेत.

## एअर-इंडियाची सर्वांगीण प्रगती

### विमानांचा कार्यक्षम वापर

एअर इंडियाला ३१ मार्च, १९६९ अखेर संपलेले वर्ष चांगले गेले. त्याचे उत्पन्न ५५·०१ कोटी रु. वरून ५९·५० कोटी रु. वर गेले आणि निव्वळ नफा १·८४ कोटी रु. चा १·८९ कोटी रु. झाला. १९६८–६९ मध्ये कार्पोरेशनची वाहतूकशक्ती ६·३% ने वाढली, परंतु उपयोगात आणलेल्या वाहतूकशक्तीने १३·२% ची वाढ दर्शविली. १९६८–६९ मध्ये कार्पोरेशनने ३,३१,०५१ उतारूंची वाहतूक केली; १९६७–६८ मध्ये २,८५,४५९ उतारूंची वाहतूक केली होती. म्हणजे, उतारूंच्या वाहतुकीत १६% ची सुधारणा झाली. कॉर्पोरेशनचे प्रत्येक विमान आकाशात असण्याची दररोजची सरासरी १०·४ तास एवढी भरली; जगातील सर्व विमान कंपन्यांत विमानांचा एवढा कार्यक्षम वापर क्वचितच झालेला आढळतो. कमीत कमी वेळ विमाने जमिनीवर राहू देणे आणि त्यांचा ज्यास्तीत 'जास्तीत उपयोग करणे, ह्या बाबतीत एअर इंडियाची कामगिरी अभिमानास्पद आहे. कॉर्पोरेशनच्या स्थापनेच्या वेळी सरकारने त्यात जे २६·८२ कोटी रु. गुंतविले, त्या गुंतवणुकीत गेल्या सात वर्षांत वाढ झालेली नाही. कॉर्पोरेशनने आपल्या वार्षिक उत्पन्नातून ३१ कोटी रु. ची भांडवली गुंतवणूक केली आणि कॉर्पोरेशनची जिंदगी ४५·६३ कोटी रु. वर नेली. कॉर्पोरेशनने १२२ कोटी रु. ची (१६·३ कोटी डॉलर्स) कर्जे मिळविली असून त्यात येत्या वर्षी २२·५ कोटी रु. ची (३ कोटी डॉलर्स) भर पडणार आहे. कारण, चौथे जंबो विमान खरेदी करण्यात येणार आहे. कॉर्पोरेशनचा कार्यक्षम कारभार आणि आर्थिक सुव्यवस्था ह्यावरील परदेशी सावकार-संस्थांचा विश्वास त्यावरून दिसून येतो. कॉर्पोरेशन एक दुय्यम कंपनी स्थापून तिच्या करवी मुंबईमध्ये दोन हॉटेल्स काढणार आहे. एक जुहूच्या किनाऱ्यावर ३०० खोल्यांचे आणि दुसरे सांताक्रूझ विमानतळावर १०० खोल्यांचे. त्यांस अनुक्रमे ४ कोटी आणि १ कोटी रु. खर्च येईल. हा खर्च कार्पोरेशन स्वतःच्या पैशातूनच करील.

### वसुलीसाठी चेक्सची विमानमार्गे रवानगी

दूरच्या ठिकाणच्या चेक्सचे कलेक्शन लवकर व्हावे ह्यासाठी हिंदी प्रमुख व्यापारी बँका विमानवाहतुकीचा उपयोग करण्यास प्रारंभ करणार आहेत. त्यामुळे, चेक्सच्या वसुलीला सध्याच्या १० ते १५ दिवसांऐवजी तीन ते चार दिवस पुरतील. ह्या नव्या योजनेप्रमाणे, प्रमुख ठिकाणची क्लिअरिंग हौसेस् इंडियन एअर लाइन्सच्या रात्रीच्या विमानांतून चेक्सचे गठ्ठे वसुलीसाठी पाठवितील. सध्या, प्रत्येक बँक स्वतंत्र रीतीने पोस्टाने चेक्स धाडते.

---

# कंपन्यांतील नोकरीचे सत्य स्वरूप

## संपत्तीच्या उत्पादनास हातभार लावण्याचे महत्त्व

प्रत्येक औद्योगिक कंपनीचे अस्तित्व तिच्या आर्थिक पराक्रमावर अवलंबून असते. कंपनीने कारखान्याभोवती उत्कृष्ट बाग केली, नोकरांच्या येण्या-जाण्याची व्यवस्था केली, सामाजिक जीवनास हातभार लावला, पण तिने आर्थिक यश मिळविले नाही, तर ती टिकूच शकत नाही. ज्या किमतीला माल विकत घेण्यास गिऱ्हाईक तयार आहे, त्या किमतीला तो किफायतशीर पुरविता आला पाहिजे. कंपनीची संपत्ती निर्माण करण्याची ताकद वाढत गेली पाहिजे. कंपनीची आणि तिच्या घटकांची प्रत्येक हालचाल आर्थिक सुपरिणाम घडवून आणणारीच असावी लागते. काम करणारी माणसे आणि वापरण्यात येणारा माल, ह्यातून तिला जास्तीत जास्त संपत्ती निर्माण करावयाची असते. कंपनीच्या सर्व घटकांचा प्रत्येक कण आणि क्षण उत्पादनवाढीकडेच उपयोगात आणला पाहिजे.

उद्योगधंद्यांतील यशस्वी लोकांची उच्च आर्थिक राहणी आणि त्यांचे उच्च सामाजिक स्थान डोळयांत भरते; पण त्यामागील तपश्चर्या दृष्टीस पडत नाही. त्यामुळे, औद्योगिक क्षेत्राचा प्रत्यक्ष अनुभव तरुणांना कष्टप्रद वाटतो. पूर्वीच्या काळी मुली विवाहानंतर माहेराहून सासरी नांदायला गेल्या, म्हणजे त्यांना जो फरक जाणवायचा, तोच फरक घरगुती आणि विद्यापीठाच्या सुखकारक वातावरणातून कारखान्यांत नोकरीसाठी जाणाऱ्या तरुणांना जाणवतो. कॉलेजांतील आणि विद्यापीठांतील सुरम्य आणि स्वच्छंदी वातावरणाची सवय झालेल्यांना अगदी सुखाची नोकरीही प्रारंभी कठीण वाटते. औद्योगिक क्षेत्रातील आव्हानकारक नोकरी तर त्यांना फारच कठीण वाटणे स्वाभाविक आहे. तेथील प्रत्येक गोष्टीला आर्थिक मोजमाप असते. फुकट कुणीच कुणाला देत नाही. कंपनीला जे परवडेल, नव्हे फायदा देऊन जाईल, तेच फक्त येथे केले जाते. त्या मर्यादेतच येथे इतर गोष्टींना वाव मिळणार.

तरुण पदवीधरांना हे सर्व अपरिचित असते. देण्यापेक्षा घेण्याचाच विचार त्यांच्या डोक्यात चालू असतो. कारण, औद्योगिक नीतीची त्यांना कल्पनाच नसते. पहिल्या मुलाखतीच्या वेळीच तरुण उमेदवार सुट्ट्या, भरपगारी रजा, भत्ते, बोनस इत्यादींबद्दलच विशेष आस्था दाखवितो; पगारवाढीबद्दल आश्वासने अपेक्षितो. मालकाच्या डोक्यात वेगळाच विचार चालू असतो. "ह्या तरुणाला कामावर घेतल्यामुळे उत्पादनात, विक्रीत किती सुधारणा होईल? तो काटकसर किती घडवून आणील? त्याच्यामुळे कंपनीचा किती फायदा होईल?" असे प्रश्न तो स्वतःला विचारीत असतो. साहजिकच, त्या तरुणाची चाचणी पुरी झाल्याखेरीज तो कोणतेही आश्वासन देऊ इच्छित नाही. आत्मविश्वास असणारे तरुण हे आव्हान स्वीकारतात. काही वर्षांपूर्वी कनिष्ठ नोकर म्हणून लागलेले आता सेक्रेटरी, मॅनेजर, डायरेक्टर, म्हणूनही उच्च पदाला पोचू शकतात. जास्त मोबदला देऊन त्या मानाने खूपच जास्त वाढावा उरत असेल, तर जास्त पगार देणे कंपनीला फायदेशीर ठरते आणि ती खुषीने तसा पगार देतेही; नफ्यातही वाटा देते.

### इथे कातडी चिवटच हवी...

प्रत्येक कंपनीचे जे आर्थिक धोरण असते, ते व्यवस्थापनात प्रतिबिंबित होते आणि प्रत्येक बॉस त्या धोरणाचीच अंमलबजावणी करीत असतो. प्रत्यक्ष बॉसची नोकरी आणि उत्कर्ष ह्या धोरणाच्या यशस्वी कार्यवाहीवरच अवलंबून असतात. बॉसमध्ये कंपनीच्या धोरणाचा परिपाक आढळून येतो. तेव्हा, बॉसचे हे स्वरूप नीटपणे ध्यानात आणणे, हे औद्योगिक क्षेत्रात पाऊल टाकणाऱ्या प्रत्येक तरुणाचे कर्तव्य ठरते. त्याखेरीज तो नोकरीच्या जागी स्थिरावणारच नाही. बॉस म्हणजे विद्यार्थ्यांशी खेळीमेळीने वागणारा, त्यांचे सर्व काही चालू देणारा, लोकप्रिय होऊ पाहणारा, प्राध्यापक किंवा प्रिन्सिपॉल नव्हे!

औद्योगिक क्षेत्रात नोकरी करू इच्छिणाऱ्यांनी प्रारंभीच्या पगारापेक्षा पुढील मजलीकडे लक्ष द्यावे. 'द्यावे तसे घ्यावे' हा नियम येथे तंतोतंत लागू पडतो; कामचुकारांना कमीतकमी पगार देणेही कंपन्यांना परवडत नाही; त्यांना काढूनच टाकले जाते.

कंपनीमधील वातावरण स्पर्धामय असते. बाहेरून कितीही एकोपा दिसला, तरी प्रत्येकजण किमान सहकार्यांच्या चौकटीत एकमेकांचे शत्रुत्वच करीत असतो; वातानुकूलित कारखान्यांतून आणि कचेऱ्यांतून 'जंगली' वातावरण असते. "नैसर्गिक रीत्या निवड होऊन अत्यंत लायक असेच प्राणी जिवंत राहू शकतात" ह्या डार्विनच्या सुप्रसिद्ध सिद्धांताचे प्रात्यक्षिक येथे पाहण्यास मिळते. कंपनीची, तिच्या व्यवस्थापनाची म्हणजे असेर बॉसची ही निष्ठुरता तरुणांना पचनी पाडावी लागते.

कामाच्या जागी हळुवार मनाला गुंडाळूनच ठेवावे लागते. स्वतःची कातडी चिवट करून घ्यावीच लागते.

---

### १,००० वर्षे मुदतीची बँक ठेव

जपानमधील एका मनुष्याने २५० रुपये ३० डिसेंबर रोजी एका बँकेत १,००० (एक हजार) वर्षांच्या मुदतीने ठेव म्हणून ठेवले. त्याच्या वंशजाला २९७० सालच्या १ जानेवारीला रु. ४२×४२×४२×४२×४२×४२×४२×४२×४२×४२ एवढी रक्कम मिळेल. व्याजाचा दर द. सा. द. शे. ५·५ आहे.

---

### देहान्त शिक्षेचा अंत

ग्रेट ब्रिटनमध्ये देहान्त शासनाची कायद्यातील तरतूद रद्द करणारे बिल लॉर्डांच्या सभेने मंजूर केले आहे.

---

### संयुक्त राष्ट्र संघटनेसाठी नवी इमारत

संयुक्त राष्ट्र संघटनेचे सरचिटणीस उ थांट ह्यांनी संघटनेच्या सर्वसाधारण सभेकडे संघटनेसाठी इमारत बांधण्यासाठी मंजुरी मागितली आहे. संकल्पित नव्या इमारतीबरोबरच जुन्या इमारतीचा विस्तार करून अधिक सोयी व साधने निर्माण करण्याचे कामही हाती घेण्यात यावयाचे आहे. न्यूयॉर्कमधील मॅनहटन बेटावरील सध्याच्या इमारतीइतकाच खर्च नव्या इमारतीसाठी येणार आहे. इमारतीसाठी ७·३ कोटी डॉलर्स अथवा ५४·७५ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. संघटनेच्या सभासदांची सध्याची संख्या १२६ आहे. नव्या इमारतीच्या खर्चाची वाटणी त्यांच्यावर बसविण्यात येईल. त्याशिवाय ऐच्छिक देणग्यांचाही स्वीकार करण्यात येईल. अलीकडे संघटनेच्या कामाचा पसारा वाढत चालला आहे. त्याबरोबर कचेऱ्यांची जागा अपुरी पडत आहे.

---

### कच्छमधील दुर्मिळ जंगली गाढवे

वन्य पशुपक्ष्यांच्या विविधतेत भारताचा क्रम आफ्रिकेखालोखाल लागतो. अशा जनावरांत आसाममधील एकशिंगी गेंडा, रेवा भागात पैदा झालेला पांढरा वाघ, अशी दुर्मिळ जनावरे आहेत. कच्छमधील जंगली गाढवेही अशीच दुर्मिळ असून जगांत ती इतरत्र कोठेही सापडत नाहीत. गीरच्या जंगलात सांभाळून ठेवण्यात आलेल्या आशियातील सिंहांप्रमाणेच त्यांची संख्याही रोडावत चालली आहे. जंगली गाढवांच्या प्राथमिक पाहणीत असे आढळून आले आहे की, त्यांची संख्या आता अवघी ३६२ उरली आहे. ह्या गाढवांच्या दुर्मिळतेमुळे त्यांना किंमतही चांगली येते. वन्य पशु-पक्ष्यांसाठी अभयस्थाने निर्माण करण्यात येत आहेत. ह्या गाढवांसाठीही अशा अभयस्थानांची आवश्यकता आहे.

---

### शेतकऱ्यांना कर्जपुरवठा

पाटणा येथे 'व्यापारी बँकांनी शेतीला करावयाचा कर्जपुरवठा' ह्या विषयावर एक परिसंवाद भरविण्यात आला होता. परिसंवादाच्या शेवटी बिहारच्या सरकारला असा इषारा देण्यात आला की, तगाई कर्जे सोडून व्यापारी बँकांनी शेतकऱ्यांना द्यावयाची इतर स्वरूपाची सर्व कर्जे थांबविण्यात यावीत. ह्या इषाऱ्याची कारणे देताना असे सांगण्यात आले की, राज्यात अधिकारावर येणाऱ्या वेगवेगळ्या सरकारांची कर्जाची वसुली करण्याबाबतची धोरणे भिन्नभिन्न असतात. त्यामुळे त्यांची फेड करण्याच्या बाबतीत शेतकऱ्यांना सबबी सांगण्यास जागा मिळते. व्यापारी बँकांनी शेतकऱ्यांना छोट्या व मध्यम आकाराच्या पाणीपुरवठ्याच्या योजना, नलिका विहिरी, दूधपुरवठा, जमीनसुधारणा, इत्यादी बाबतींत कर्जपुरवठा करावा असा सूर परिसंवादात दिसून आला.

---


## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी :
९ बँक हाऊस लेन,
फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी :
महाल, नागपूर

| | |
|---|---|
| भाग-भांडवल व निधी | रु. १४,६२,२०,००० |
| ठेवी | रु. ७४,५७,३६,००० |
| खेळते भांडवल | रु. १,४२,०९,१२,००० |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक

---

तारेचा पत्ता "मॉर्गेज"
मुख्य कार्यालय दूरध्वनी २६१४९७
उपकार्यालय क्र.१ दूरध्वनी २६०३०६
उपकार्यालय क्र.२ दूरध्वनी २९०००६

## दि बॉंबे स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, डुगल रोड,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.
(स्थापना १९३५)

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्जवाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९६८ अखेर बँकेचे भागभांडवल ५ कोटी २८ लक्ष रु., गंगाजळी ३० लक्ष रु., ऋणविमोचन निधीची गुंतवणूक २१ कोटी रु. व येणे कर्जे ६७ कोटी रु. आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

गो. प. भावे
कार्यकारी संचालक

### सहकारी सोसायट्या आणि सरकारी पैसा

३·३२ कोटी रु. सरकारी गुंतवणूक असलेल्या १,१९८ सहकारी सोसायट्यांनी तोटा दाखविला असून, ९·५२ कोटी रु. सरकारी गुंतवणूक असलेल्या ९८३ सोसायट्यांनी पुरेसा नफा मिळविला नाही. ४·४९ कोटी रु. गुंतवणूक असलेल्या फक्त १५० सोसायट्यांनी ५·२% नफा दाखविला आहे. महाराष्ट्र विधानसभेच्या हिशेब समितीने सहकारी सोसायट्यांनी सरकारी पैसा नीट न वापरल्याबद्दल टीका केली आहे. सरकारच्या पुढाकारानेच सहकारी सोसायट्या काढण्यात आल्या, संबंधित लोकांत सहकारी नेतृत्व नसले आणि कार्यक्षम, धंदेवाईक पद्धतीने कारभार चालविण्याची व्यवस्था केलेली नसेल तर असे होणे स्वाभाविक आहे. हिशेब समितीने कित्येक प्रक्रिया सोसायट्यांची तपासणी करण्यात यावी, असे सुचविले आहे. सोसायट्यांच्या संचालक मंडळावर सरकारचा प्रतिनिधी नेमून उपयोग होत नाही आणि असे लायक प्रतिनिधीही पुरेसे मिळणे शक्य नाही. त्याचप्रमाणे, समितीने सुचविल्याप्रमाणे, ज्या सोसायट्यांना २० लक्ष रु. पेक्षा जास्त कर्ज सरकारने दिलेले आहे, अशा सोसायट्यांच्या संचालक मंडळावर विधानसभेचे प्रतिनिधी नेमूनही फायदा होणार नाही. सोसायटीच्या सभासदांत निष्ठेचा अभाव, हेच बहुतेक सोसायट्यांच्या अडचणींचे मूळ आहे, अशी सरकारनेच कबुली दिली आहे. सरकारकडून आणि सोसायटीकडून जेवढे मिळविता येईल तेवढे मिळवावयाचे, पण स्वतःची जबाबदारी मात्र पार पाडावयाची नाही, ही वृत्ती कमी कशी होईल, ही खरी समस्या आहे.

---

**कुटुंब-नियोजनामुळे अनीतीस चालना** — कुटुंब-नियोजनामुळे स्वीडनमधील लोकांची नीतिमत्ता बिघडली आहे. विवाहितांपैकी ९९% लोकांनी विवाहापूर्वीच रतिसुख अनुभवलेले असते, असा एका पाहणीचा निष्कर्ष आहे. प्रत्येक दहांतील एक अपत्य अनौरस असते.

---

**बॉंबे चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष, राजाध्यक्ष**—बॉंबे चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या १९७०–७१ च्या अध्यक्षपदी हिंदुस्तान लिव्हर लि. चे चेअरमन, श्री. व्ही. जी. राजाध्यक्ष, ह्यांची निवडणूक झाली आहे.

---

**स्त्रियांना केसांचे टोप फुकट** —स्त्रियांना ग्रेट ब्रिटनमधील नॅशनल हेल्थ सर्व्हिस दरसाल प्रत्येकी दोन केसांचे टोप पुरविते. त्यामुळे ब्रिटिश सरकारला २ कोटी रुपये खर्च येतो. हे टोप दुरुस्तीत राखून स्वच्छ ठेवण्याचा खर्चही सरकारच सोसते. 'जो देश अशा टोपांवर दरसाल २ कोटी रुपये खर्च करतो, तो देश भलत्या गोष्टींना फाजील महत्त्व देतो, असेच म्हणावे लागेल" अशी त्यावर ब्रिटिश मेडिकल जर्नलने टीका केली आहे.

---





**GADRE BROTHERS**
ENGINEERS & FOUNDERS
MADHAVNAGAR [S. Rly.]
Phone: 318 Sangli — Gram: 'SEWA' Madhavnagar



सन १९६९–विशेष सेवा वर्ष

अनेक उद्देश साध्य करून देणारी

★ संचित मुदत ठेव ★

( क्युम्युलेटिव्ह डिपॉझिट खाते )

• व्याज दरात वाढ •

| मासिक हप्ता रुपये | १२ महिने रुपये | २४ महिने रुपये | ३६ महिने रुपये | ६० महिने रुपये |
|---|---|---|---|---|
| ५ | ६२ | १२८ | २०० | ३६२ |
| १० | १२४ | २५७ | ४०० | ७२४ |
| २० | २४८ | ५१४ | ८०० | १४४८ |
| १०० | १२४० | २५६८ | ४००० | ७२४० |

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

मुख्य कचेरी :- राजपथ सातारा

स्थापना १९३६ ◆ शाखा ३७

# छोट्या माणसाची सतत सेवा हीच आमची अभिमानास्पद परंपरा



## छोटे धंदेवालेच बँक ऑफ महाराष्ट्र ला मोठे वाटतात

हे स्वाभाविकच आहे. कारण बँक ऑफ महाराष्ट्र ही छोट्या लोकांचीच बँक आहे. अल्प भांडवल असलेले, कारागीर, टॅक्सीवाले, रिक्षावाले वगैरेंना बँक आजपर्यंत मदत करीत आलेली आहे.

आमचे ७०% कर्जदार या वर्गातीलच आहेत. १०,००० रु.हून कमी रकमांची कर्जे घेतलेले १२,००० लोक आहेत. असे एकूण २८ कोटी रु. कर्जरूपाने दिलेले आहेत.

**तुमच्याही छोट्या-मोठ्या धाडसात तुम्हाला महाराष्ट्र बँकेचे आर्थिक साहाय्य खचितच मिळू शकते.**

तपशीलासाठी आजच चौकशी करा:

**बँक ऑफ महाराष्ट्र**

हेड ऑफिस: ११७७ बुधवार पेठ, पुणे-२

67108



हे पत्र पुणे पेठ, शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.